उपविभागीय अधिकारी मलकापुर यांचे कार्यालय

रा.प्र.क्र एन.ए.पी ३४ /मोताळा / ०५ /२०१९-२०

# आदेश

(दिनांक २७/११/२०१९)

प्रस्तुत प्रकरणाची कार्यवाही अर्जदार श्री. राजेश गुलाबचंद राठी रा.मेहकर ता.मेहकर जि.बुलढाणा यांनी सादर केलेल्या निवासी प्रयोजनार्थ रुपांतरीत झालेला प्लॉट वाणिज्य प्रयोजनार्थ परावर्तीत करणेबाबतचे विनंती अर्जावरुन सुरु करण्यात आली. अर्जा सोबत त्यांनी ७/१२ उतारा, आदेशाची छायांकित प्रत इत्यादी कागद पत्र दाखल केली आहे. त्यांनी त्यांच्या अर्जा मध्ये मौ. मोताळा ता.मोताळा येथील गट नं.३ अ मधील प्लॉट क्र. ८ क्षेत्र ४५३.००व प्लॉट क्र.९ क्षेत्र ३७५.००एकुण ८२८.०० चौ.मी. जमीन उपविभागीय अधीकारी मलकापुर यांचे फायलावरील रा.प्र. क्र. एन.ए. पी. ३४ /मोताळा /१९४/२००७-०८ तारीख २३/०६/२००८रोजीच्या आदेशानुसार निवासी अकृषक करण्याची परवानगी घेतलेली आहे. सदर भुखंड हा उपरोक्त आदेशान्वये अकृषक झालेला आहे. सदर प्लॉट ची आकारणी १० पैसे प्रमाणे आहे. सदर अकृषक रुपांतरणाबाबत परवानगी देण्यास हरकत नाही.

१) प्रकरणात श्री. राजेश गुलाबचंद राठी रा.मेहकर ता.मेहकर जि.बुलढाणा यांनी त्याच्य मालकीचे मौ. मोताळा ता. मोताळा येथील गट नंबर ३अ मधील प्लॉट क्र. ८ क्षेत्र ४५३.००व प्लॉट क्र.९ क्षेत्र ३७५.००एकुण ८२८.०० चौ.मी. निवासी प्रयोजनातुन वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषक करुन सदर जागा वाणिज्य प्रयोजनास नियमाकुल करुन मिळण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार त्यानी सदरहु वापर नियमीत करुन मिळण्याबाबत अर्ज सादर केला आहे.

२) सदर जमीनीच्या अकृषक आकारणीचा दर चौ.मी. ला २० पैसे अर्जदाराला मान्य असल्याचे कबुल केले आहे.

वरील बाबीचा विचार करीता सदर जमीनीच्या प्रस्तावित अकृषक निवासी प्रयोजनातुन वाणिज्य प्रयोजनार्थ उपयोगाची परवानगी देण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग परीपत्रक क्रमाक एन.ए.पी १०८८/के.आर.ए/१२७५/१-२ दिनांक १२/१०/१९८८ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी उपविभागीय अधिकारी मलकापुर याव्दारे मौ मोताळा ता. मोताळा येथील गट क्र ३ अ मधील प्लॉट क्र. ८ क्षेत्र ४५३.००व प्लॉट क्र.९ क्षेत्र ३७५.००एकुण ८२८.०० चौ.मी. आर भुखड अर्जदार श्री राजेश गुलाबचंद राठी रा.मेहकर ता.मेहकर जि.बुलढाणा याच्या मालकीची व ताब्यातील असुन निवासी मधुन वाणिज्य कामाकरीता अकृषक वापर करण्याची परवानगी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्याखालील तयार केलेल्या नियमातील तरतुदीच्या अधिन राहुन खालील अटीवर अंतीम मंजुरात देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने रस्त्याच्या मध्यभागापासुन १५ मी.(नियत्रंण रेषा) अंतरापर्यत इमारतीचे पक्के बांधकाम करु नये.

ब) अर्जदाराने सार्वजनीक बांधकाम विभागाच्या रस्त्यास कोणत्याही जोडरस्त्याचे बांधकाम पुर्वपरवानगीशिवाय करु नये.

क) रस्त्याच्या जमीनीचा वापर वाहणे ठेवण्यासाठी किंवा कोणतेही साहीत्य ठेवण्यासाठी करु नये.

ड) अर्जदाराने रस्त्याचे हददीमध्ये पाणी निचरा होण्याच्या पध्दतीमध्ये अडथळा निर्माण करु नये.

३) प्रस्तावीत वाणीज्य वापराच्या अनुषंगाने संभाव्य अपघात जिवीतहानी व वित्तहानी न होण्याचे दृष्टीने

आवश्यक व्यवस्था आवेदकास स्वखर्चाने करावे लागेल.

४)राज्य शासनाकडुन अथवा कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाकडुन किंवा कोणत्याही महामंडळाकडुन किंवा शासकीय कंपनीकडुन करण्यात आलेला कोणताही कायदयाअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम विनियम किंवा आदेश यांच्या

Scanned with Ca

५) ज्या दिवसापासुन ख-याखु-या वाणीज्य वापरासाठी जमीनीचा अशा प्रकारे प्रत्यक्षात वापर सुरु केल्यापासुन ३० दिवसाचे आत त्याबाबत तहसिलदार मोताळा व उपविभागीय अधिकारी मलकापुर यांना माहीती दयाची. तसे न झाल्यास महाराष्ट्र महसुल अधिनियम १९६९ वा नियम क्र.०६नुसार अर्जदाराविरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

६) लगताचा भुखंड धारकाच्या सुधिधाधारकास बाधा येता कामा नये.

७ जमीनीच्या हद्दीबाबत काही वाद अथवा अडचण असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८) अर्जदाराने महाराष्ट्र जमीन महसुल(कन्र्हशन ऑफ युज ऑफ अग्रीकल्चर ॲन्ड एन ए असेसमेट नियम १९६९ च्या नियम क्र ४(१)(सी) च्या परिशिष्ट क्र २ व ३ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करावे.

९)अर्जदाराने अकृषक झालेल्या जमीनीची वाणिज्य आकारणी ८२८.०० चौ.मी.ला २० पैसे प्रति चौ प्रमाणे १६६ रु भरणा करावा. वाणिज्य प्रयोजनाव्यतिरिक्त जमीनीच्या उपयोगात काही बदल झाल्यास त्याची आकारणी वेगळ्या दराने करणे आवश्यक राहील. आकारणी वस्तुस्थितीच्या अनुषंगाने पहील्या हमी कालावधी पर्यत ठरवुन घेण्यात आली आहे. त्या नंतर सुधारीत दराने आकारणी बदल झाल्यास निश्चीत करण्यात येईल.

१०) अकृषक कर रुपये १६६/- अकृषक दराच्या आठपट जिल्हा परीषद कर, ग्रामपंचायत सेस रु १३२५/- रुपये रुपातरीत कर अकृषक कराचे पाचपट ८२८ रु अशी एकुण २३१९ रु अर्जदाराने शासकीय कोषागारात त्वरीत भरणा करावा.

११)वाणीज्य विभागाकडे नियम व नियमावरील नुसार आवश्यक असलेल्या विदयुत पुरवठयाकरीता व अनुज्ञेय मनुष्यबळाकरीता रितसर परवानगी घेण्यात यावी.

१२) जमीनीच्या वापरासंबधी सध्या अस्तित्वात असलेले व इतर अधिनियम व नियम याच्या अनुषंगाने सदर परवानगी देण्यात येत असुन ती अधिनियम व नियम परिस्थिती नुसार प्रस्तुत प्रकरणी लागु राहतील सदर जमीनीचा निवासी कर रद्द करण्यात येवुन वाणीज्य अकृषक कर लागु करण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी
मलकापुर

प्रतिलिपी:- १ तहसिलदार मोताळा यांना आदेशाची प्रत योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

२ तलाठी मोताळा ता. मोताळा जि. बुलडाणा यांना आदेशाची प्रत योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

३ उप अधीक्षक भुमी अभिलेख मोताळा यांना आदेशाची प्रत योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

४ मुख्याधिकारी नगर पंचायत मोताळा ता.मोताळा जि.बुलडाणा यांना आदेशी प्रत योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

५ श्री.राजेश गुलाबचंद राठी रा.मेहकर ता.मेहकर जि. बुलडाणा यांना माहीतीकरीता रवाना.

२७/१/१९

उपविभागीय अधिकारी
मलकापुर

Scanned with Ca

ब द ३
२१
२०९६
९१ – २८




Scanned with Ca